मुलगा, मांजर आणि जादूची सारंगी

मराठी : अश्विनी बर्वे





कोणे ऐके काळी एक छोटा मुलगा एका
म्हाताऱ्या लाकुडतोड्या बरोबर राहत असे.

एक दिवस म्हाताऱ्या लाकुडतोड्याने छोट्या मुलाला सांगितले, “मला खूप दूर जायचं आहे. कदाचित मी परत कधी येणार नाही.”





“मला पण तुमच्या बरोबर घेवून चला,” छोटा मुलगा म्हणाला.

“मी तुला आपल्या बरोबर घेवून जावू शकत नाही,” म्हातारा लाकुडतोड म्हणाला.

“पण मी तुला तीन गोष्टी देईन. ज्यामुळे तुझे नशिब उजळून निघेल.”

मग म्हाताऱ्याने मुलाला
एक जुनी कुऱ्हाड दिली.



एक जुनी सारंगी दिली.





आणि एक डोळा असणारं मांजर दिलं.



त्यानंतर लाकुडतोड्या निघून गेला.



“याचं मी काय करू?” मुलांनं विचारलं.
“मी एक जुनी कुऱ्हाड, एक जुनी सारंगी,
आणि एक डोळा असणाऱ्या मांजर घेवून
मी काय करू?” मी या तिन्ही गोष्टी
इथेच सोडून जाईन.”



“मी ही तुझ्याबरोबर येईन,” मांजर म्हणालं
“मला माहीत नव्हतं की तू बोलू शकते,”
मुलगा म्हणाला.

“तुला खूप कमी माहिती आहे,” मांजर म्हणालं.
“पण तुला काही गोष्टी तर माहीत आहेत.
त्यामुळे तू लवकर शिकू शकशील. चल आता
आपण जाऊ या.”



मग मुलाने कुऱ्हाड उचलली.





मांजराने सारंगी उचलली.



मग त्यांनी आपला प्रवास सुरु केला.

ते चालत राहिले, चालत राहिले.





“मला भूक लागली आहे,” मुलगा म्हणाला.



“मला पण भूक लागली आहे,” मांजर म्हणालं.





“माझ्या जवळ खाण्यासाठी काही नाही.”
मुलगा म्हणाला.
“चला मग झोपून घेवू या,” मांजर म्हणालं.
“उद्या मी सारंगी वाजवेन मग त्यातून
आपल्याला जरूर काही खायला मिळेल.”

“एक डोळा असणाऱ्या मांजराने वाजवलेली
सारंगी कोण ऐकेल?” मुलगा म्हणाला.
“तू बघच,” मांजर म्हणालं.
मग मांजर आणि मुलगा झोपी गेले.




दुसऱ्या दिवशी ते काहीसे पुढे गेले.
“बघ!” मांजर म्हणालं.
“अरे!” मुलगा म्हणाला. “बघ इथं कितीतरी खायला आहे. लोक पिकनिकला आले आहेत,” मुलगा म्हणाला.





मग मुलगा आणि मांजर पळत टेबलाजवळ गेले. “आम्हांला खूप भूक लागली आहे,” मुलगा म्हणाला.

“आम्हांला काही खायला द्या ना,” मांजर म्हणालं.



“तुम्ही इथून पळा!” एक माणूस म्हणाला.

“कृपा करून आम्हांला काही खायला द्या,” मुलाने भीक मागितली.

“मग माझं मांजर सारंगी वाजवून तुमचं मनोरंजन करेन,” मुलगा म्हणाला.

“एक डोळा असलेल्या मांजराची सारंगी कोण शहाणा ऐकेल? तो माणूस म्हणाला. “तुम्ही इथून पळा.”



“मी माझी सारंगी जरूर वाजवेन,” मांजर म्हणालं. मांजर म्हणालं. मग त्यानं सारंगी वाजवायला सुरुवात केली..






जसं मांजर सारंगी वाजवू लागली, तसं लोकांनी नाचण्यास सुरुवात केली. लोक नाचायला मजबूर झाले. ते नाचतच राहिले. कारण सारंगी मध्ये एक प्रकारची जादू होती.



पुरूच नाचतात, स्त्रिया नाचतात आणि मुलंही नाचतात.

सगळ्या गायी नाचू लागल्या. डुक्कर नाचू लागले. ते आपली आपल्याला रोखू शकले नाही. टेबल नाचू लागले, पातेली नाचू लागल्या, ताटं नाचू लागली.



“सारंगी बंद कर! थांबवा!” लोक ओरडले. पण मांजराने सारंगी वाजवणे चालूच ठेवले. मग लोकांचे नाचणे सुद्धा चालूच राहिले. शेवटी लोक नाचत-नाचत खाली पडले.



“आता” मांजराने मुलाला म्हटले,” चल आता खाऊन घेवू.” त्यानंतर मांजर आणि मुलाने इतकं खाल्लं की शेवटी ते काहीच खाऊ शकले नाही.



“तुला जास्त माहीत नाही, अजून तुला थोडीच माहिती आहे. पण लवकरच तू अजून काही शिकशील.” मांजर म्हणालं.






“मला माहीत नव्हतं की तुझी सारंगी ऐकून लोक नाचू लागतील,” मुलाने म्हटलं.

त्यांनतर मुलगा आणि मांजर पुढे गेले.

रस्त्यात त्यांना एका राजा भेटला.
“पळा!” राजा ओरडला. “आपले प्राण
वाचवण्यासाठी पळा!”

“का?” मुलाने विचारलं.

“बघा एक भयानक देखो ड्रैगन येत
आहे,” राजा म्हणाला.








“जर आम्ही ड्रैगनला मारलं तर तुम्ही आम्हांला काय द्याल?” मांजरानं विचारलं.

“मी तुम्हांला सोन्याच्या मोहरांनी भरलेल्या दिन थैल्या देईन.” राजा म्हणाला. मग राजा आपल्या महालात जावून लपला.



“चल, लवकर
झाडावर चढ,”
मांजर म्हणालं.
“मला ड्रैगन
येतांना दिसत
आहे.”



ड्रैगन विश्रांती साठी योगायोगाने
त्याच झाडाखाली बसला.



“वाह!” मुलगा म्हणाला.
“जरा त्या ड्रैगन्सकडे बघ”


“तो फक्त एक वो ड्रैगन आहे” मांजर म्हणालं,” “त्या ड्रैगन ची तीन डोकी आहेत.”


“सांग मी काय करू?” मुलाने विचारलं. “मी त्याचं एक डोकं उडवू का?”

“मग तो दुसऱ्या डोक्याने तुला खाईन, आणि तिसऱ्या डोक्याने मला खाईन!”




लवकरच ड्रैगनचा एक डोळा बंद झाला. मग दुसरा डोळा बंद झाला. मग त्याचा तिसरा डोळा बंद झाला. हळूहळू त्याची सहाही डोळे बंद झाले.





“आता मी माझी सारंगी वाजवेन,” मांजर म्हणालं. “मी इतकी मधुर धून वाजवेन की ड्रैगनची तिन्ही डोकी झोपी जातील.” मग मांजर सारंगी वाजवू लागली. त्याने एक खूप मधुर धून वाजवली.



“आता,” मांजर म्हणालं, “मी सारंगीवर मधुर धून वाजवत राहीन तोपर्यंत ड्रैगन गाढ झोपेत राहीन. मग तू त्याचे तिन्ही डोकी उडव.”



मग ड्रैगन तिथेच लवंडला आणि गाढ झोपी गेला.

मग मुलाने जुनी कुऱ्हाड उचलली आणि एक वार त्याने पहिल्या डोक्यावर केला.दुसऱ्या डोक्यावर दुसरा वार करून ते ही उडवलं. तिसऱ्या डोक्यावर वार करून त्याने तिसरं डोकं उडवलं आणि अशा प्रकारे ड्रैगनचा खात्मा झाला.





“मला माहीत आहे की तुझी सारंगी ऐकून लोक झोपतात, पण मला हे माहीत नव्हतं की तुझी सारंगी ऐकून ड्रैगनपण झोपेन.”

“तुला अजून काही फारसं माहीत नाही,” मांजर म्हणालं. “पण तुला आता पहिल्यापेक्षा जास्त माहीत झालं आहे. हळूहळू तुला अधिक माहिती होईल.





“आता तुम्ही आम्हांला
सोन्याच्या मोहरांच्या तीन
थैल्या द्या,” मांजर म्हणालं.
“कैसी थैलियाँ?” राजा म्हणाला,
“कोणचे सोने?”

त्यानंतर मुलगा आणि
मांजर राजाकडे गेले.
“आम्ही ड्रैगनला मारून टाकले,” मुलगा
म्हणाला. “तुम्ही स्वतः पाहू शकता.”


“ड्रैगनला मारण्यासाठी तीन थैल्या सोन्याच्या मोहरा देण्याचे आपण वचन दिले होते,” मुलगा म्हणाला.



“मी म्हणतो तुम्ही इथून निघून जा, नाहीतर मी तुम्हांला तुरुंगात टाकेन,” राजा म्हणाला. “मी आत्ता जेलरला बोलावतो.



राजाने जेलरला बोलावलं. “या मुलाला आणि मांजराला घेवून जा आणि यांना जेल मध्ये बंद करा.”



“पण ....” मुलगा म्हणाला,

दुसऱ्या दिवशी सकाळी जेलर आला. त्याने मुलाला आणि मांजराला काही पोळ्या आणि पाणी दिलं. “तुम्हांला फक्त एवढंच खाणं मिळेल,” जेलर म्हणाला.





“आता कोण शहाणा आपल्याला मदत करेन,” मुलगा म्हणाला.
“मी तुला मदत करेन,” मांजर म्हणालं.
“मी सारंगीने तुला मदत करेन. बघच तू.”

“नाही! नाही!” जेलर म्हणाला. “एक डोळा असणारं मांजर सारंगी काय वाजवेल आणि कोण ती ऐकेन?”





“तुमचं खूप आभार!” मुलगा म्हणाला. “आता माझं मांजर तुमच्यासाठी सारंगी वाजवेन.”

“काही हरकत नाही. मी तरीपण सारंगी वाजवते,” मांजर म्हणालं. मग मांजरानं सारंगी वाजवली.




मग मांजराने सारंगीवर उदास धून वाजवली. ते ऐकून जेलर रडू लागला.

जेलर रडत राहिला. त्याने रडणे थांबवलं नाही. कारण मांजराची सारंगी जादूची होती.





मांजर सारंगी वाजवतच राहिली. बिचारा उदास जेलर, रडत राहिला. रडतच राहिला. तो तिथंच बसून रडू लागला.



मग मुलाने जेलचा दरवाजा उघडला.



त्यानंतर मुलगा आणि मांजर
जेल मधून बाहेर आले.



मग मुलगा आणि मांजर पुढे गेले. त्यांची दोस्ती आयुष्यभर कायम राहिली.



समाप्त